# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १७१-२२ दिनांक :- ०९/०६/२०२२

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये महाराष्ट्र सुरक्षा बलाचे मिळणार ५०० जवान.

ठाणे जिल्हयातील मिरा-भाईंदर व पालघर जिल्हयातील वसई-विरार महानगरपालिका व नजीकचे गावे अधिकारक्षेत्रात सामाविष्ठ करुन दिनांक ०१/१०/२०२० रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची निर्मीती करण्यात आलेली आहे. मात्र नवनिर्मित पोलीस आयुक्तालयामध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने पोलीसांच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडचणी येत होत्या.

पोलीस बंदोबस्त, नाकाबंदी व इतर दैनंदिन कामकाजामध्ये मदत करण्याकरिता महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान मिळावे यासाठी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने शासनाकडे मागणी करुन पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानुसार शासनाने ५०० सुरक्षा जवान पोलीस आयुक्तालयास देण्याचे मंजुर करुन पहिल्या टप्यामध्ये दिनांक १५/६/२०२२ रोजीपासुन महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २५० जवान मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये कर्तव्यासाठी हजर होणार आहेत.

----ooo---